## तरूण भारत



कोल्हापूर : भगवान महावीर अध्यासनासाठी १ लाखाच्या देणगीचा धनादेश कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांना देताना डॉ. राजेंद्र पाटील. सोबत प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. विजय ककडे, डॉ. नेमिनाथ शास्त्री, डॉ. बी डी खणे आदी.

# भगवान महावीर अध्यासनास डॉ. पाटील यांची १ लाखाची देणगी : कुलगुरूंकडे धनादेश सुपूर्द

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील भगवान महावीर अध्यासनाच्या प्रस्तावित इमारतीसाठी प्रा. डॉ. राजेंद्र बी. पाटील यांनी १ लाख रुपयांची देणगी कुलगुरू डॉ. डी टी शिर्के यांच्याकडे सुपूर्द केली. याप्रसंगी प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, लेखा अधिकारी अजित चौगुले डॉ. नेमिनाथ शास्त्री (बाहुबली विद्यापीठ) व डॉ. बी. डी. खणे उपस्थित होते. डॉ. राजेंद्र पाटील हे विद्यापीठात समाजशास्त्राचे माजी विभागप्रमुख व भगवान महावीर अध्यासनाचे माजी समन्वयक आहेत. भगवान महावीर अध्यासनाच्या इमारतीसाठी दानशूरांनी मदत करावी, असे आवाहन अध्यासनाचे डॉ. विजय ककडे यांनी केले आहे.

लोकमत

# पुढील वर्षी मोबाइल उपवास

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : भगवान महावीर अध्यासन शिवाजी विद्यापीठमार्फत महावीर जयंती २०२३ निमित्त अध्यासनाच्या सर्व विद्यार्थ्यांनी मोबाइल उपवास म्हणजे मोबाइल वापराचा कालावधी मर्यादित ठेवण्याचा अभिनव उपक्रम पुढील भगवान महावीर जयंतीपर्यंत राबविण्यात येणार आहे.

या उपक्रमामध्ये सर्व विद्यार्थी व शिक्षक आहारापूर्वी व आहारानंतर किमान १-१ तास म्हणजे प्रती दिन किमान दोन तास मोबाइल बंद ठेवणार आहेत.

या उपक्रमाचे शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वित्त व लेखा अधिकारी अजित चौगुले यांनी अभिनंदन केले आहे.

पुढारी

# विद्यापीठ भगवान महावीर अध्यासनातर्फे मोबाईल उपवास उपक्रम

कोल्हापूर । पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठ भगवान महावीर अध्यासनाच्या वतीने महावीर जयंती निमित्त अध्यासनाच्या सर्व विद्यार्थ्यांनी मोबाईल वापराचा कालावधी मर्यादित ठेवण्याचा अभिनव उपक्रम सुरू केला आहे.

उपक्रमामध्ये सर्व विद्यार्थी व शिक्षक आहारापूर्वी व आहारानंतर दोन तास मोबाईल बंद ठेवणार आहेत. मोबाईलचा वापर साधन म्हणून आवश्यक असला तरी त्यातून मोबाईलच्या आहारी जाण्याचे प्रमाणही वाढले आहे. यासाठी कुटुंबात मोबाईलचा सम्यक वापर केला जावा याकरिता मोबाईल उपवासाचा उपक्रम राबविला जात आहे. पुढील भगवान महावीर जयंतीपर्यंत हा उपक्रम साजरा केला जाणार आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वित्त व लेखा अधिकारी श्री. अजित चौगुले यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे.

सकाळ

# भगवान महावीर अध्यासनाचा 'मोबाईल अपरिग्रह'

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनतर्फे महावीर जयंतीनिमित्त अध्यासनाच्या विद्यार्थ्यांनी 'मोबाईल अपरिग्रह' म्हणजे मोबाईल वापराचा कालावधी मर्यादित ठेवण्याचा अभिनव उपक्रम हाती घेतला आहे. पुढील भगवान महावीर जयंतीपर्यंत हा उपक्रम राबवण्यात येणार आहे. या उपक्रमामध्ये सर्व विद्यार्थी व शिक्षक आहारापूर्वी, जेवणापूर्वी व जेवणानंतर किमान १-१ तास म्हणजे दररोज किमान २ तास मोबाईल बंद ठेवणार आहेत. या उपक्रमाबद्दल कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वित्त व लेखा अधिकारी अजित चौगुले यांनी अभिनंदन केले.